**बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्याबाबत...**

वसंतप्रभा आरोग्य सेवा प्रतिष्ठान, बुलढाणा संचलित, वसंतप्रभा कॉलेज ऑफ नर्सिंग, ता.जि. बुलढाणा

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एनयुआर-२०१५/प्र.क्र.१३४/१५/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- १९ जुलै २०१७

वाचा :
१. शासनाचे समक्रमांकित दिनांक ६.०१.२०१६ चे आवश्यकता प्रमाणपत्र
२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्रमांक एमयुएचएस/ पीबी/ युजी/ नर्सिंग/कन्से/७५/२०१६, दिनांक ०३.०२.२०१६.
३. भारतीय परिचर्या परिषदेच्या संकेतस्थळावरील मान्यताप्राप्त संस्थांची यादी

**प्रस्तावना:**

वसंतप्रभा आरोग्य सेवा प्रतिष्ठान बुलढाणा संचलित वसंतप्रभा कॉलेज ऑफ नर्सिंग, ता.जि. बुलढाणा येथे ३० (तीस) विद्यार्थी क्षमतेसह बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संदर्भ क्रमांक (१) अन्वये "आवश्यकता प्रमाणपत्र" देण्यात आले होते. त्यानुषंगाने संदर्भ क्रमांक (२) नुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संस्थेस संलग्निकरण दिले आहे. भारतीय परिचर्या परिषदेने संदर्भ क्रमांक (३) अन्वये संस्थेच्या बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता ३० (तीस) विद्यार्थी प्रवेशास परवानगी दिली आहे. त्यान्वये सदर अभ्यासक्रमास ३० (तीस) विद्यार्थी क्षमतेसाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून प्रवेशास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

वसंतप्रभा आरोग्य सेवा प्रतिष्ठान बुलढाणा संचलित वसंतप्रभा कॉलेज ऑफ नर्सिंग, ता.जि. बुलढाणा या महाविद्यालयास भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून ३० (तीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास दिलेली मान्यता विचारात घेऊन पुढील अटी व शर्तींच्या अधीन याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाबाबत राज्य शासन /केंद्र शासन /मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एस्सी.अभ्यासक्रमासाठी केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.



PRINCIPAL
VasantPrabha College
of Nursing,Buldana

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र. VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम /कायदा, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था त्यांच्या शासकीय वैद्यकीय /दंत/ परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवा निवृत्त अथवा स्वेच्छासेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही, याबाबतचे रू.५०/- च्या स्टँप पेपरवरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती /अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

९) संस्थेने बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

१०) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

१३) भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची महाविद्यालयास अनुक्रमे मान्यता व संलग्निकरण जोपर्यंत आहे, तोपर्यंत हा शासन निर्णय वैध असेल.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्री.पु.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव:-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

D:\2015\BSC\CR-134-2015-वसंतप्रभा नर्सिंग कॉलेज बुलढाणा.GR.docx

PRINCIPAL
VasantPrabha College
of Nursing,Buldana

३. मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती/ शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
९. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, इएसआयसी रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड, मुंबई ८०.
१०. प्राचार्य, वसंतप्रभा कॉलेज ऑफ नर्सिंग, ता.जि. बुलढाणा
११. कक्ष अधिकारी, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (शिक्षण-१).

PRINCIPAL
VasantPrabha College
of Nursing,Buldana